ठाणे
वाची
१५८५
९८६

॥ ... ॥

# ...बलाज्ञान-सुधा

आणि

## श्रीमन्महाभारतांतील सुबोध वेंचे.

मुद्रक व प्रकाशक,

ह. गो. सडेकर धनंजयप्रेसचे मालक आणि लोकमित्राचे संपादक
खानापूर.

आवृत्ति ३ री.

सन १९०९.

किंमत ०१ आणा.

लावून घेत
असान
नि

॥ श्री दत्तात्रेय प्रसन्न ॥

# अबलाज्ञानसुधा.

ढा. क्र ४९३

## भाग १ ला.

( लेखिका-एक भगिनी. )

हे अबला हो ! तुह्मांला सदुपदेशाचे दोन शब्द सांगण्याची पाळी आज माझ्यावर आलेली आहे. तुमचे घरीं एखादा पाहुणा आला ह्मणजे जसें त्याचें मोठ्या काळजीनें तुह्मीं आदरातिथ्य करतां, तसें या खालीं लिहिलेल्या चार ओळींनां मान देऊन, त्यांचा आपल्या कोमल व मृदु अंतःकरणावर पूर्ण ठसा उमटवून, त्याप्रमाणें आपलें वर्तन ठेवाल, तर त्यांत माझ्या श्रमाचें सार्थक होऊन आदरसत्कार केल्यासारखें होईल. खालीं लिहिल्याप्रमाणें तुह्मीं आपलें वर्तन ठेविल्यास संसारसमुद्रांतील अनेक प्रकारचीं संकटें दूर होण्याचा संभव असून, पुढें तुह्मांला व तुमचे मुलांबाळांनां दुःखाचे दिवस पहावे लागणार नाहींत व पुढें तीच किंवा तुमचीं मुलें, सुना, यांनां लागून त्यांनां या भवसागरांतून तरून जाण्याचा सुलभ मार्ग सांपडेल; व तीं आपले दिवस सुखानें जाण्याकरितां, नव्या युक्त्या काढतील; परंतु ही संसाररूपी " इमारत " इतक्या थरास आणण्यास तिचा पाया आतांपासून मजबूत केला पाहिजे.

तरच सर्व कांहीं होईल व सदरहु इमारत चांगल्या उदयास येईल; आणि तुह्मीं जर या वेळेस मागें घ्या, तर मात्र इमारतीकरितां आणलेल्या सर्व सामानाची नासाडी होईल; ह्मणून धीर न सोडतां, न घाबरतां, खालीं लिहिल्याप्रमाणें आपलें वर्तन सुधारण्यास स्वतःच्या कंबरा बांधून तयार व्हा आणि लक्ष्य देऊन वाचा.

" तुमचें मुख्य व पहिलें कर्तव्यकर्म ह्मटलें ह्मणजे पतीची आज्ञा शिरसामान्य करणें हें होय. पतीशिवाय तुह्मांला दुसरा देव नाहीं, धर्म नाहीं, कांहीं नाहीं. तोच तुमचा स्वामी, तुमचा जीव, तुमचा संरक्षक, तुमचा धनी आणि तोच तुमचा राजा. त्याच्या व तुमच्या सहाय्य संसारांतलीं हरएकप्रकारचीं कामें सुरळीत व बिनबोभ चाललीं पाहिजेत. असें होण्यास प्रथम त्याची व तुमची एकी झाली पाहिजे. ती एकी तुह्मीं जर त्याचेविषयीं मनांत पूज्यबुद्धि बाळगाल तरच होईल; एरवीं होणार नाहीं. पहा ! ज्या माउलीचे सदय हृदय–उदरांत नऊ मासपर्यंत तुह्मीं गर्भवास केला, तोंपर्यंत तिनें तुमचें ओझें वाहिलें. पुढें प्रसूतीच्या अत्यंत वेदना सोसिल्या, कित्येक वर्षेंपर्यंत तुमचे जीवापलिकडे लालनपालनादि उपचार केले. नंतर अग्नी, देव व ब्राह्मण यां सर्वांसमक्ष तुह्मा ज्याची पुरती कधीं तोंडओळख देखील नाहीं, अशा एखाद्या परकीय [illegible] पदरांत घातलें, तेव्हांपासून तुमचेविषयींचें [illegible] स्वामित्व त्यानें आपल्या

लावून घेतलें. तुमच्या आईला तुह्मीं एकुलत्या एकच कां असाना, तरी तिला तेव्हां काय वाटलें असेल? जर तुमचे नशिबानें नवरा चांगला मिळाला तर तो तुमचे आईला दुःख होऊं देणार नाहीं. पण असे जांवई शेंकडा पांच सांपडले तर सांपडतील, नाहींतर मग बाकीचे " जामातो कृष्ण सर्पश्च " या ह्मणीप्रमाणें वांया जाणारेच सांपडतील. असो! त्याच्या घरीं तुह्मीं गेलांत ह्मणजे तो तुह्मांला आपल्या सर्व प्रकारच्या सुखदुःखाची, घराची, असेल त्या द्रव्याची मालकीण बनवितो. तुमची काळजी त्याला किती असते पहा बरें! तुमचे पोटाची भर करण्याकरितां, तो आपल्या अमोलिक शरीराचे हाल करून, समुद्र ह्मणत नाहीं, ऊन ह्मणत नाहीं, अरण्य ह्मणत नाहीं, तहान व भूक ह्मणत नाहीं; तुमचेकडे जीव लावून बादळामध्यें रात्रीच्यारात्री जागरणें काढतो, दिवसभर थंडीवाऱ्यांतून कुडकुडतो, उन्हाचे ताप सोसतो व दमून थकून घरीं येतो, त्या वेळेस त्याला तुमचें साखरपाणी नको किंवा कांहीं नको, फक्त प्रेमाचें व हास्यमुखांतील मंजुळ व नम्र भाषण, निष्कपटपणा व सांगितलेलें काम मन लावून करणें, इतकें तुह्मीं त्याला दिलें ह्मणजे जरी त्याचे आंगाचा घामाघाम झाला आहे, पाय दुखून भूक लागली आहे, घसा कोरडा पडला आहे, असें असूनही आणखी जरी त्याचे डोक्यावर मोठें कर्जाचें ओझें असलें तरी त्याला या आनंदापुढें त्या सर्वांचेंही कांहींच वाटत नाहीं. राजाशीं भ[illegible]ागण्याचा जसा प्रजेचा धर्म आहे.

तसाच पतीपाशीं प्रीतीनें वागण्याचा तुमचा मुख्य धर्म आहे.

भगिनीहो ! तुह्मांला दागिन्यांची फार हौस असते व ती हौस जर नवऱ्याकडून न पुरली गेली तर ते नवरे कांहींकांना आवडतही नाहींत. अशी तऱ्हा आह्मीं पुष्कळ ठिकाणीं पाहिली आहे. कुलस्त्रियाहो ! विचार करा कीं, नवऱ्याला १५–२० रुपये दरमहा पगार मिळतो, त्यांत कांहीं रुपये आईबापाला देणें भाग आहे; व बाकीच्यांत त्याला तुमचें व मुलांबाळांचें संगोपन करावें लागतें; तर अशा स्थितींत त्यानें तुमची हौस कोणत्या तऱ्हेनें पूर्ण करावी बरें ? शिवाय दागिने घातल्यापासून ह्मणजे आंगीं फारसें मास येतें असें थोडेंच आहे ? काहीं स्त्रिया, लोकांनीं आपल्यास श्रीमान ह्मणावें ह्मणून व काहीं तर केवळ नखऱ्याकरिताच आंगावर दागिने घालतात. अबलाहो ! लोकांनीं तुह्मांस गरीब किंवा श्रीमान् ह्मटलें याचा आनंद, दुःख हीं मुळींच वाटूं देऊं नयेत; कारण या जगात अनेक प्रकारचे लोक आहेत. एकाला पळ ह्मणतील, दुसऱ्याला त्याचे पाठीस लागावयास सांगतील, परंतु तुमच्या घरांत जर आज तांदूळ, डाळ किंवा गहूं नाहींत, तर कोणी एका चवलाचे आणून देईल काय ? कोणीही देणार नाहींत. फक्त बोलण्यास मात्र सर्व तयार असतात. तर अशा या दांभिक बोलण्यावर भरंवसा ठेवून गरीब नवऱ्याजवळ दागिन्यांसाठीं हट्ट घेऊन बसूं नका. दागिन्यांनीं शक्ति येत नाहीं, पोट भरत नाहीं, तहान भूक व मानसिक अगर शारीरिक दुःखाचें हरणही होत नाहीं; मग ते दागिने

तुमचाविषय ... गमित.

पाहिजेत तरी कशाला? फक्त सौभाग्यदाक दागिज जे आपले वाडवडिलांपासून घालीत आले, ते ह्मटले ह्मणजे नथ, वज्रटीक, मंगळसूत्र, मूद पाटल्या, व जोडवीं कानांत असल्याच तर बुगड्या. इतके असले ह्मणजे पुरे आहेत. इतकेही नच मिळाले तर सौभाग्यदायक कपाळभर कुंकू लावावें आणि हातभर बांगड्या घालाव्यात, मग त्या काळ्याच कां असेनात, ह्मणजे झाले सर्व दागिन्याविषयीं जसा तुह्मीं हट्ट घेतां, तसा तुह्मा स्त्रियांना साजणारा जो "पातिव्रत्य" रूपी दागिना तो आपले आंगावर घालण्याचा तुह्मीं आपले मनाचा दृढनिश्चय कां करीत नाहीं? पतिव्रताधर्माची थोरवी केवढी आहे, हें तुह्मास माहीत असेलच. पहा! पतिव्रता स्त्रीवर ईश्वर सदा प्रसन्न असतो, तिचेच घरीं लक्ष्मी वास करिते, तिचींच मुलें चांगलीं निपजतात, तीच घरांतील वडील माणसास व आपले नवऱ्यास मान्य व प्रिय अशी होते, आणि तिचाच सर्वत्र लौकिक होतो.

चंद्रहार, बुगड्या, काप, बाळ्या, सरी, तोडे, कंकणें, चिंचपेट्या, विरोद्या व इतर उंच उंच प्रतीचे दागिने जरी तुह्मीं आंगावर घातले तरी ते घातलेल्या ठिकाणीं मात्र शोभा देतात; परंतु सर्वांत श्रेष्ठ जो "पातिव्रत्य" दागिना तो ज्या स्त्रीनें घातला, तिच्या सर्वांगीं शुद्ध कांतीची प्रभा फांकते. तर अबलाहो, संसारसुखात तुह्मांला हा सोबती फार उपयोगी आहे. ह्मणून पहिल्याने हा ग्रहण करण्यास पैसा मुळींच खर्च करावा लागत नाहीं, किंवा कोणाचें आर्जवही करावें लागत नाहीं. फक्त मनाचा दृढनिश्चय

केला ह्मणजे झालें. तुकोबांनीं एका अभंगांत लिहिलें आहे कीं, " निश्चयाचें बळ। तुका ह्मणे तेंची फळ. " तर अबलाहो! एवढी मला देणगी द्या, ह्मणजे मी कृतकृत्य झालें असें समजेन. एक दृढ निश्चय केला कीं, सर्व कांहीं साध्य झालेंच असें समजा.

आतां दयाळू इंग्रजसरकारानें तुह्मांला शिक्षण देण्याचा प्रघात घातला आहे. तें ह्मणजे उत्तम वक्तृत्व संपादण्याकरितां किंवा पहिले नंबरची वकिलीण बनून मोठमोठ्या सभांत किंवा सरकारी कोर्टांत जाऊन वादविवाद करण्यासाठीं नव्हे, तर आपलें मुख्य कर्तव्य काय, आपण जगामध्यें कोणत्या- रीतीनें वर्तन ठेविलें असतां, आपलें हित होईल, हें सम- जण्याकरितां आहे. बायांनो! तुह्मांस थोडेंसें वाचावयास येऊं लागलें ह्मणजे तुह्मीं चांगलीं चांगलीं पुस्तकें वाचून, त्यांतील हितोपदेशाचाच तेवढा भाग घेऊन व त्याचा आपले अंत:करणावर पूर्णपणें ठसा उमटवून, त्याप्रमाणें आपल्या रीतिभाती व वर्तन ठेविल्यास खरोखर तुह्मीं सौख्यगिरीचे माथ्यावर जाऊन बसाल, आणि तेथें जर तुह्मीं दृढनिश्चय करून असाल तर त्या ठिकाणाहून तुह्मांस खालीं उतरविण्यास कोणी देखील समर्थ होणार नाहीं. अबलांनो! वाचावयास किंवा लिहावयास शिकण्याकरितां ह्मणजे शाळेंतच गेलें पाहिजे असें नाहीं, तर घरींच आपल्या लहानमोठ्या भावंडांजवळ अगर आपले नवऱ्याजवळ शिकला तरी चालेल. पहा! प्रख्यात श्रीमति सौ० डाक्टर आनंदीबाई ही कांहीं पहिल्यापासून शाळेंत गेलेली

नव्हती तर ती एवढ्या प्रख्यातीस येण्यास, विद्वान् होण्यास व इतिहासपटांत आपलें नांव अजरामर करून घेण्यास सर्वतोपरी तिचा भर्ताच तिला गुरु होता. भगिनींनो! अशीं हीं कांहीं पुस्तकें आहेत कीं, जीं वाचल्याबरोबर, तुमचीं अप्रबुद्ध व कोमल मनें बहकतील; तर अशीं पुस्तकें नुसतीं डोळ्यांनीं पाहूं देखील नका. तुमच्याकरितां बऱ्याच स्वदेश-बांधवांनीं **सौभाग्यरत्नमाला, सद्गुणी मून, आनंदीबाई, वधुदर्पणमाला, संसारमार्गोपदेशिका** इ० व आणखी दुसरीं पुष्कळ पुस्तकें—केवळ रत्नांचीं भांडारें भरून ठेवलेलीं आहेत. हीं पुस्तकें तुम्हीं एकदां वाचा बरें! म्हणजे तुमचें तुम्हांलाच त्यांतील बरेंवाईट समजून येईल. तुम्हीं अशा-प्रकारचे विषयांचा अभ्यास केला पाहिजे कीं, ज्याचे-योगानें तुमचे मानसिक चंचलतेला उत्तेजन न मिळतां उलटा तिजवर चांगला दाब ठेवितां येईल; व ज्याच्या-योगानें फाजील किंवा अगदीं खोट्या अशा सुधारणांकडे मनाची धांव कधींही जाणार नाहीं व ज्याच्यायोगानें विचार करण्याची, तुलना करण्याची, एकीकरण करण्याची व रूढी चालविण्याची तुम्हांस संवय होईल; त्याच्या-योगानें तुमची तारतम्यशक्ति इतकी प्रखर होईल कीं, आंत कांहीं राम नसतां, बाहेरून झळक्या मारणाऱ्या गोष्टींचा सर्वस्वी त्याग करण्याचें धैर्य तुम्हांस येईल; ज्याच्यायोगानें कोणत्याही गोष्टीचा सुंदरपणा, नवेपणा व चकाकीपणा यांजवर भिस्त न ठेवितां व त्यांचे दांभिक

मोहकतेला भुलून न जातां, जें केवळ योग्य व उपयुक्त अशाचाच आपले हृदयांत संग्रह करून ठेवण्याचें शहाणपण तुमचे अंगीं येईल. सारांश, ज्या ज्ञानाचा बाजार बसवावयाचा नाहीं, तर ज्याच्यायोगानें संसाररूपी मायाजालाचीं गृहसूत्रें सुरळीत चालतील, असेंच ज्ञान संग्रहीत केलें पाहिजे; आणि अशाच ज्ञानाचा तुमचे व्यवहारांत खप आहे; तर तुह्मीं वर सांगितलेल्या गोष्टींचें ज्ञान संसारांतील दररोजचे नियमित गृहधंदे आटोपून राहिलेल्या वेळात संपादण्याचा प्रयत्न करा. असें मात्र करूं नका कीं, उठलें सुटलें नि बसलें पुस्तकांचे ढीग पुढें मांडून. तर बायांनों, तुह्मीं डोंगराएवढाल्या जरी पुस्तकांच्या राशी मांडून बसलांत तरी त्यांपासून कांहीं देखील फायदा व्हावयाचा नाहीं; कारण सर्व प्रकारचें ज्ञान ह्मणजे पुस्तकांतच लिहिलेलें आहे असें नाहीं, तर कांहीं अंश पुस्तकांत आहे, कांहीं वडील माणसांचे उपदेशानें व कांहीं रीतिभातीनें नवऱ्याचे व आपले सामाजिक वर्तनापासून, दुसरे लोक कसे वागतात हें पाहिल्यानें, मैत्रिणींचे संगतीनें व कांहीं स्वतःची बुद्धि खर्च केल्यानें प्राप्त होतें. त्यास ह्मणजे शिकण्याकरितां शाळेंतच गेलें पाहिजे किंवा सारा वेळ पुस्तकेंच वाचलीं पाहिजेत असें तुह्मीं मुळींच समजूं नका. काम करून त्रास व शीण आला आहे अशा वेळीं पुस्तक हातांत घेऊन वाचीत बसलें तर हरकत नाहीं. त्यापासून करमणूक होऊन पुस्तकांतील बोधार्थही समजतो.

---

# भाग २ रा.

मैत्रिणींनो ! आपल्या वडिलांची एक ह्मण प्रचारांत पडली आहे कीं, "बायको भली तर नवरा भला." ही ह्मण तुह्मांस माहीत असेलच. नसल्यास यापुढें ही पक्की ध्यानांत ठेवा, व इचा दररोज पाठ करीत जा. जी स्वत: भली असते, तिचा नवराही भलाच यांत संशय नाहीं; कारण नवरा तुमच्याशीं भला किंवा बुरा असणें हें बहुतेक-अंशीं तुमचे सद्वर्तनावर अवलंबून आहे. जर तुह्मीं त्याचे मनाप्रमाणें वागाल, त्याच्या व आपल्या मतानें संसारांतील हरएक गोष्टी कराल, तो ज्या स्थितींत असेल त्या स्थितीला योग्य असा आपला खर्च ठेवाल, व इतर मोठ-मोठे व्यवसाय करण्याचें त्याला उत्तेजन येण्याकरितां आनंदी ठेवाल, तर असा कोणता नवरा आहे कीं, जो तुमचेबरोबर आनंदी आणि ममताळूपणानें रहाणार नाहीं ? तो नेहमीं अशीच इच्छा करितो कीं, तुमच्या संगतीनें त्याचे व तुमचे आयुष्याचे दिवस सुखानें जावेत व लोकांत आपली कीर्ति व्हावी. जसा तो तुमचेविषयीं काळजी घेऊन अपरिमित श्रम घेतो, तशी तुह्मींही त्याजविषयींची काळजी बाळगणें अवश्य आहे. तुह्मीं चांगल्या सदाचरणी असणें हाच पुरुषांचा शहाणपणा, सामर्थ्य आणि धैर्य हीं होत; तुह्मीं जर मनाच्या स्थीर, दृढनिश्चयी आणि मित-व्ययी असाल, तर कोणत्याही स्थितींत नवरा असला तरी तो धैर्य सोडीत नाहीं. तुह्मीं जर घरांत आळस,

उधळेपणा आणि अव्यवस्था ठेविली, आणि नवऱ्यानें बाहेरून किती जरी शहाणपणाचा व्यवहार केला, तरी त्याचा कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं.

कोणत्याही नवऱ्याकडून वाईट स्त्रीचा त्रास फार दिवस सोसवणार नाहीं. पुरुषाचें मन जरी घट्ट आहे तरी तें कांहीं दगडाचें केलेलें नाहीं. त्यांना मोठमोठे उद्योग व पराक्रम करून पैसे मिळविण्याची हौस असते खरी, तरी हें सर्व सिद्धीस जाण्यास त्यांचें मन शांत असलें पाहिजे. जरी तो चांगला चतुर व बुद्धिमान् मनुष्य असला, तरी विशेषेंकरून त्याला संसाराच्या धक्काधक्कींतून पार पाडण्याला सुविचाराचें अंग असणें बरेंच अवश्य आहे. त्याच्या त्रासलेल्या जिवाला विश्रांति देण्याला घर ह्मटलें ह्मणजे गोडीगुलाबीचें आणि समाधानीचें स्थान असलें पाहिजे. अशा ठिकाणीं तो आला तर त्याच्या थकलेल्या अंतरात्म्याला आल्हाद होऊन दुप्पट बळ येतें, आणि पुन्हां संसाराच्या खटपटीसाठीं बाहेर जाण्याला त्याला ताजी हुशारी उत्पन्न होते; पण घरींच जर शांति मिळाली नाहीं, सर्वदा धुसपुस, जळफळ, फडफड, तुसडेपणा, हेवा व खिसखीस याशीं गाठ पडली; फिर्यादी, गाऱ्हाणीं, निंदा याचीं टोचणी सुरू झालीं तर त्याची छाती खचून जाऊन बिचाऱ्याची निराशा होते. ज्याला संसाराची फारशी काळजी नाहीं, अशाही पुष्कळ लोकाची अशीच स्थिति आहे. याचें कारण स्त्रीचें तेज नवऱ्याचे सुखास व दुःखास,

कीर्तीस व अपकीर्तीस, सुवर्तनास व दुर्वर्तनास अशा प्रत्येक गोष्टीस स्त्रियाच कारण आहेत. तर बायांनों, तुह्मीं आपलें वर्तन सदाचरणी ठेवाल तरच संसारांत सुख होईल. नवऱ्यास हरएक तऱ्हेचे उद्योग करण्यास हुषारी येईल; इतर तुमच्या मैत्रिणी तुमचाच कित्ता वळविण्याचा प्रयत्न करतील; व तुमच्या उपदेशाच्या गोष्टी ऐकण्याकरितां तुमचे जवळ येऊन बसतील; तर पहा कीं, हरएक प्रकारची गोष्ट तुमचेवर अवलंबून आहे.

दुसरें, वडील माणसांसमोर आढ्यतेनें बसणें किंवा लोळणें हें चांगलें नव्हे. असल्या कृत्यापासून आपणास मोठेपणा मिळणें तर एकीकडेस राहतो, परंतु उलटा हलकटपणा व मूर्खपणा मात्र अंगीं लागतो. तसेंच मोठ्यानें बोलणें, खो खो हंसणें, हेंही स्त्रीजातीला योग्य नाहीं. स्त्रियांचा शब्द नाजूक असावा; हंसणें दुसऱ्याला ऐकूं जाऊं नये; चालतांना पाय वाजूं नयेत; या व अशा दुसऱ्या पुष्कळ गोष्टींतच तुमचा मोठेपणा आहे व तुमच्या इतर वडील माणसांसही भूषण आहे. नाहीं तर आपल्यालाही दूषण; शिवाय अमक्यांच्या मुली, त्यांना रीतच नाहीं; त्यांना आईबापांची शिक्षा नाहीं; नवऱ्याचा धाक नाहीं, असें लोक बोलूं लागतात. बायांनों! ईशकृपेनें घरीं श्रीमंती असली ह्मणून कांहीं काम करूं नये असें नाहीं व चाकरमाणसें घरांत राबत असतां त्यांना बसवून ठेऊन आपणच मोठालीं कष्टाचीं कामें करणें व शरीराला मुद्दाम

त्रास करून घेणें हेंही वाईटच. तर फारसे कष्टही करूं नयेत व अगदीं आळशीही बसूं नये. कारण आळसापासू काहिंच सुख होत नाहीं. जसा कष्ट केल्यापासून शरी त्रास होतो तसाच आळसापासूनही होतो. ह्मणून कांह कांहीं तरी अंगमेहनत करावीच. त्यांत नेहमींचा स्वयंपाक, नानाप्रकारचीं पक्वान्नें, तसेंच पंक्तीमधून वाढणें, ह्या गोष्टी तर तुह्मांला अवश्य आल्या पाहिजेत. कितीएक स्त्रिया मी अशाही पाहिल्या आहेत कीं, त्यांना आपल्या थोड्याशा श्रीमंतीच्या तोऱ्यामुळें केरकचऱ्यामध्यें बसणें सुद्धां वाईट वाटत नाहीं; घरांतील चाकर अथवा कुळंबीण जर घरांतल्याच एखाद्या कामांत गुंतली आणि थोड्याशा श्रमानें तो केर दूर होण्यासारखा असला, तरी त्या तिकडे ढुंकूनही पहात नाहींत. मोलकरणीला मात्र शिव्यांची लाखोली वाहतील, पण स्वतः हातांत केरसुणी घेऊन झाडणार नाहींत किंवा तशा त्या घाणेरड्या जागीं बसल्या असतां उठून एकीकडे होणार नाहींत. पण बायांनों ! लक्ष्मी ही दोनप्रहरच्या सावली प्रमाणें आहे. अशा चंचल श्रीमंतीचा कधींही भरंवसा धरूं नये व गर्वही कधीं वाहूं नये. कारण, या गर्वाचे योगानें पुढें ‘ आळस ’ हा शत्रु तुमचेवर आपला अंमल बसवील. हा आळस त्या सर्व दुःखाचें मूळ आहे, तुह्मांला पतिसेवेचा कंटाळा येईल व गृहकृत्याविषयीं जी कांहीं सावधगिरी ठेवावयाची असते ती तुमचे हातून राहणार

नाहीं, असें झालें ह्मणजे संसाररूपी इमारत स्थीर न राहतां ढांसळून जाईल व आपण आरंभिलेल्या कार्याचा नाश होईल व तोच आपला सुखांतला जीव दुःखांत घालण्यास कारणीभूत होईल.

तर असें करूं नका. तुह्मां उभयतां नवराबायकोचें सुखदुःख एकमेकांवर अवलंबून आहे. प्राणाशिवाय जसें शरीर जिवंत राहूं शकत नाहीं, तसें तुह्मीं एकमेकांशिवाय कोणाकडूनही सुखी होऊं शकणार नाहीं. जर तुह्मीं परस्परांना प्राणापेक्षांही प्रिय असाल तर तुमचा खरा स्त्रीपुरुषांचा जोडा शोभेल. पतिसेवा करणें हें तुमचें कर्तव्यकर्म आहे व धर्माज्ञेप्रमाणें व विवाहाचे वेळीं दिलेल्या वचनाप्रमाणें तुह्मास वागविणें हें तुमच्या पतीचें कर्तव्यकर्म आहे. काय केलें असतां व कोणत्या रीतीनें उभयतांस सुख व संतुष्टता प्राप्त होईल हाच विचार मनांत बाळगून उभयतांनीं एक-मेकांस सुख देण्याकरितां मनापासून झटलें पाहिजे. जी स्त्री पतीचें प्रेम वाढविण्याचा नेहमीं प्रयत्न करिते, नवरा रागावला असतां किंवा त्याची आपणावर इतराजी झाली असतां जी खेद बाळगीत नाहीं व पुनः त्याचें मन संतो-षित करण्यासाठीं जी मनापासून झटते; पती कितीही वाईट चालीचा असला तरी शांति, क्षमा आणि विचार यांच्या योगानें जिच्या मनांत त्याजविषयींची वाईट बुद्धि उत्पन्न होत नाहीं; तीच ' सद्गुणी स्त्री ' हें उपपद आपले नावामागें लावून घेण्यास योग्य असी होते. पतीचे सर्व दुर्गुण दूर करण्यासाठीं व त्याचें हित होण्यासाठीं जी सुविचार व

नम्रता धारण करून त्याचे सेवेंत तत्पर असते, नवऱ्याची आपल्यावर प्रीति जडली नसली तर ती जडावी ह्मणून मनापासून झटून मोठमोठीं संकटें व दुःखें सोसण्यास जी तयार असते, तीच खरी पतिव्रता होय. कित्येक स्त्रियांस वाटत असतें कीं, नवऱ्याकरितां आह्मीं दुःख काय ह्मणून सोसावें? त्यापासून आह्मांस फायदा काय? तर भगिनींनों तुह्मांला पतीशिवाय दुसरी गतीच नाहीं.

तुमचें इहलोकींचें व परलोकींचें सुख सर्वतोपरी पतीवरच अवलंबून आहे. पहा, तुह्मीं नानाप्रकारचे हट्ट घेतां, शेजाऱ्यापाजाऱ्यांशीं तंटे करितां, एकादे वेळेस न जाणून तुमचे हातून पुष्कळशी नुकसानीही होते; तर या सर्व गोष्टींस पाठीराखा नवरा आहे व तो या सर्व चुक्यांची तुह्मांला क्षमाही करितो आणि मग तुह्मीं आनंदी होतां; परंतु इतक्या गोष्टी कोणाचे सहाय्यानें झाल्या हें तुमचे ध्यानांत येत नाहीं, याचें कारण अज्ञान. याकरितां तुह्मांला शिक्षण देणें हा उत्तम मार्ग होय. हें शिक्षण देणाऱ्या इंग्रज सरकारचे व देशसुधारकांचे तुह्मीं अत्यंत उपकार मानिले पाहिजेत. असो. जर तुह्मीं नवऱ्याकरितां काय ह्मणून दुःख सोसावें, असें ह्मणाल तर 'माझ्या सुखाचे वांटेदार तरी तुह्मीं काय ह्मणून होणार?' असें जर तो ह्मणेल व तें ह्मणणें खरोखरच अमलांत आणील तर तुमची काय स्थिति होईल, व तें तुमचें ह्मणणें कोणीकडे जाईल? तर बायानों! हें ह्मणण्यास देखील तुह्मांला त्याचेंच पाठबळ आहे. स्त्रियांची बुद्धि कोती असते हें शास्त्रातरीं लिहून ठेवलेलें आढळतें

तें अगदीं शब्दशः खरें आहे. परंतु आमच्या विद्वान् व या कामीं परीश्रम घेत असलेल्या देशसुधारकांच्या अतितर प्रयत्नानें ( स्त्रियांची बुद्धि कोती, वगैरे जो कांहीं स्त्रियांचे ठायीं दुर्गुणांचा कलंक आपणांस दिसत आहे ) तो स्त्रियांना शिक्षण मिळून तथ्यातथ्य विचार करण्याची, मुलाबाळांची योग्य रीतीनें जोपासना करण्याची व संसारांत विचारानें वागून व पतीस स्वतःस सुख मिळवून घेण्याची त्यांच्यांत शक्ति उत्पन्न होईल व पुरुषांस हरएक कामांत स्त्रीचें सहाय्य मिळून उभयतां संसाराचा गाडा सुखानें वाहून आपलें नांव चालविणाऱ्या संततीस व इष्टमित्रास उत्तम व योग्य असा कित्ता घालून देतील, अशी आमची पूर्ण खातरी आहे.

स्त्रियांनों, तुह्मी असा विचार करा कीं, परलोकसुखप्राप्तीकरितां पूर्वींच्या काळच्या लोकांस किती काळपर्यंत तपश्चर्या करावी लागत असे. जी पतिसेवेकरितां आपला जीवही अर्पण करण्यास भीत नाहीं, दुष्ट लोकांनीं किती जरी तिला दूषणें दिलीं तथापि त्यांच्या कपटी व फसवणूकीच्या भाषणांस न जुमानतां आपला निश्चय सोडीत नाहीं, व जी माझें सर्व आयुष्य पतिसेवेकरितांच आहे, त्याकरितांच ईश्वरानें मला मानवजन्मास घातलें आहे, असें ह्मणते व

या...

व लोभ, प्रीति व ह्
गोष्टी ह्या क्षणभंगुर

ठेविते तीच महासाध्वींच्या मालि-
अशी होते. तिच्या पतिसेवारूपी
त असतें कीं, त्याची गणना सुद्धां
कयास अगर तुकडा मागणाऱ्या

भिकाऱ्यास एकाद्या देशाचें किंवा सगळ्या पृथ्वीचें राज्य मिळालें असतां जितका लाभ होतो, त्याच्या शतपट अधिक, पतिसेवेंत आपलें आयुष्य खर्च केलेल्या साध्वी स्त्रीस होत असतो. जी साध्वी आहे ती पतिसेवेपासून फळ मिळेल या गोष्टीकडे यत्किंचितही लक्ष ठेवीत नसते. मीं कित्येक पुस्तकांतून व जुन्या लोकांचे तोंडून पुष्कळदां असें ऐकिलें आहे कीं, कित्येक पतिव्रता स्त्रियांनीं, सर्वसंगपरित्याग करून देशोधडी व्यसनांत पडलेल्या आपल्या प्रवाशी पतीस संकटांतून व कुत्सित अशा आकाबाईचे खडतर फेऱ्यांतून आपल्या बुद्धिकौशल्यानें मुक्त केलें आहे; अशा साध्वींचीं दुःखें सोसण्याचें धाडस व दृढ निश्चय हीं तुपाहून पुष्कळ शूर व पराक्रमी पुरुषही त्यांस पूज्य मानूं लागले आहेत, व मोठाल्या मीं मीं ह्मणविणाऱ्या बकाद्य पुरुषांचाही गर्व हरण झालेला आहे.

अबलांनों! थोडें रामायणाकडे लक्ष पोंचवा. लंकाधिपती "रावण" ज्यानें त्रैलोक्य जिंकून देवांनाही आपले कबजांत आणून घरचे नौकर ( दास ) बनविलें होतें, परंतु एकट्या पतिपरायण "जानकी" अबलेला त्याच्यानें जिंकवलें नाहीं! साध्वी स्त्रीच्या पतिसेवेचें केवढें तरी मोठें हें धर्मबळ! दमयंती केवढ्या संकटांत पडली होती? राजा नळ तिला घोरतर अरण्यांत एकटीशार बायानों! हें ह्मणतरी त्याजवरील तिची पतिपरायणबळ आहे. स्त्रियांची कमी झाली काय? नाहीं किंून ठेवलेलें आढळतें चतुर्यानें संकटपार होऊन पुन

करणारी झाली ! सती सावित्रीनेंही पतीचा त्याग केला नाहीं. धन्य त्याची ! कीं, ज्यानीं या भूतलावर जन्म घेऊन आपल्या विमल कीर्तीचे अजरामर झेंडे फडकावले ! सती स्त्रियांचे सत्यनिष्ठपुढें मोठमोठ्या ऋषींनींही हात टेकले आहेत. केवळ पतिसेवा व पातिव्रत्य हें धर्म रक्षण करूनच स्त्रियांनीं आपले धर्मतेज इतकें वाढविलें आहे कीं, ज्यांच्या शक्तीची कांहीं एक कल्पनाच करवत नाहीं; ह्मणून जी पतिव्रता आहे तीच गृहधर्मिणी ह्मणजे भार्या होय

---

## भाग २ रा.

भगिनींहो ! या मायामय संसारसमुद्रामध्यें आपणां मानवी प्राण्यापैकीं कोणीच चिरकाळ राहणार नाहीं हां हां ह्मणतां दिवसामागें दिवस, महिन्यामागें महिने व वर्षांमागें वर्षें अशीं झपाट्यानें निघून जात आहेत. कांहीं दिवसांमागें आपण बालदशेंत होतों, आता तारुण्यात आहों व कांहीं दिवसांनीं आपण ह्मातारशा होईपर्यंत तरी वांचूं किंवा नाहीं हें सांगतां येत नाहीं; कदाचित उद्याच एखादा रोग होऊन एक दोन दिवसातच आपण जाणार नाहीं ह्मणून कशावरून ? अथवा या बसल्या बैठकीसच राम ह्मणावें लागेल किंवा काय याचाही भरवंसा नाहीं; याप्रमाणें आपलें जीवित, संसारांतील सुखें व दुःखें राग व लोभ, प्रीति व हेवा अशा कित्येक सरळ व त्याचेविरुद्ध गोष्टी ह्या क्षणभंगुर आहेत. मनुष्यानें संसारांतील कोण-

त्या ह्या प्रकारचें सुख व विलास हीं सदोदित जशाचीं तशींच कायम रहातील असें समजूं नये; काल अनुभविलेलें सुख आज कोठें निघून गेलें आणि आपण हल्लीं जें सुख भोगीत आहों, तेंही याप्रमाणेंच केव्हां निघून जाईल याचा नेम नाहीं. एकंदरीत सर्व स्वप्नवत् भासतें परंतु धर्म मात्र सदासर्वकाळ आपल्यापाशींच रहाणारा आहे. तो आपल्यास सोडून कधींही कोठें जाणार नाहीं.

आजपर्यंत आह्मीं जें कांहीं धर्मसाधन केलें आहे त्याचें फळ आमचे जवळ राहिलें आहे. आणि पुढें जें आपण करूं त्याचेंही फळ आपल्यामध्यें एकवट होऊन राहील. आपण मेल्यावर येथील सर्व नाशिवंत वस्तु येथेंच राहतील, त्यांतील एक देखील आपणा बरोबर येणार नाहीं; परंतु धर्म मात्र आपले बरोबर येईल आणि तोच परलोकीं आपणास अक्षय सुख देईल. त्या सुखाला कधींही मरणबाधा होणें नाहीं व कधीं त्याचा ऱ्हासही होणे नाहीं. तें सुख दिवसेंदिवस वाढत जाऊन चिरकाल रहातें; ह्मणून अहो बुद्धिमंत स्त्रियांनो! तुह्मीं जर खऱ्या साध्वी असाल, तर या संसारांतील क्षणिक सुखाकडे लक्ष न देतां जें अविनाशी सुख, तेंच साध्य करण्याकरितां धर्माचरण कराल. पतीच्या हितासाठीं व कल्याणासाठीं गरजच पडली तर कुमार्ग मात्र न आचरितां प्राण सुद्धां देणें व आमरण पतिहितसाधन करीत जाणें, हीच सर्वांत तें सुख साध्य करण्याची अति उंच पायरी होय. जर तुह्मीं मरेपर्यंत दृढनिश्चयानें पतिहितसेवेचें व्रत धारण करून रहाल तरच तुमच्या पातिव्रत्यधर्माची परिपूर्णता

होऊन, तुह्मीं पतिसहवर्तमान अनंतकाळपर्यंत स्वर्गसुख भोगाल, हें खचित समजा.

जी स्त्री पतीला सुख झालें असतां आपण सुखी होते, त्याला दुःख झालें असतां आपण त्याची दुःखविभागिनी होते, पतीजवळ असतां जी आनंदी दिसते, पती दूर गेला असतां दुःखी होऊन विरहानें निस्तेज होते, आणखी पतीवर जी मनापासून प्रेम करिते, अर्थात् जिला अंतःकरणापासून पती आवडतो व जी पतिसेवा हेंच आपलें कर्तव्यकर्म आहे असें समजते, तीच खरी पतिव्रता होय.

ही गोष्ट स्वाभाविक आहे कीं, ज्यावर आपलें पूर्ण प्रेम असतें, त्यास ज्या प्रमाणानें सुख व दुःख होईल त्याच प्रमाणानें तें आपणांस होत असतें. प्रेम करण्यास जे कोणी योग्य असतात त्यांचे सुखदुःखाशीं प्रेम करणाऱ्याचा योग जडलेला असतो; अर्थात् उभयतांचेंही अंतःकरण ऐक्यभाव प्रदर्शित करीत असतें. पतीला राग आला असतां तिला राग येत नाहीं, एवढेंच नाहीं तर ती त्याचा राग घालविण्याविषयीं शांततेनें प्रयत्न करिते, गोड बोलून जसा राग शांत होतो तसा दुसऱ्या कशानेंही होत नाहीं; ह्मणून तुमचे नवऱ्यास राग आला असतां त्याच्याशीं गोड भाषण करूनच त्याचें शांतवन करा; नवरा रागावला असतां त्याचवेळेस तुह्मांसही जर राग आला तर तोंडास तोंड होऊन कलह माजेल आणि उभयतां मधील प्रीतींत व्यत्यय येईल; यापेक्षां प्रेमवती स्त्रियांनीं आपले प्रीतिपात्र पतीस राग येण्यास व कलह करण्यास कधींच संधी देऊं नये.

सारांश, जेणेंकरून नवऱ्याचें मन आपलेविषयीं सदा-

सर्वदा प्रेमयुक्त राहील, आणि ज्या उपायांनीं त्याला समाधान होईल तेच उपाय करण्यास तुम्हीं सर्वकाळ सावध राहून झटलें पाहिजे; म्हणजे त्याला रागावण्यास कधीं संधीच सांपडणार नाहीं. कदाचित् एखादे वेळेस कांहीं कारणांनीं एकास अभिमान किंवा राग झाला, तर दुसऱ्याची नम्रता व मधुर भाषण या गुणांपुढें तो राग व अभिमान फार वेळ टिकत नाहीं. प्रेम हें कांहीं बळजोरीनें किंवा आपले इच्छेनें उत्पन्न होत नाहीं हें जरी खरें आहे तरी कृतीनें त्याची उत्पत्ति व वृद्धि होते हेंही पण खरें आहे. तुम्हांस जर नवऱ्याची प्रीति संपादणें आहे तर तुम्हीं आपलें मन पतीविषयीं एकाग्र केलें म्हणजे त्याच्याविषयींची भक्ति व प्रीति तुमचे अंत:करणांत उत्पन्न झालीच समजा; प्रीति व भक्ति तुमचे पूर्णपणें कब्जांत आली कीं उभयपक्षीं ऐक्यभाव झालाच म्हणून समजावें; आणि ऐक्यभाव झाला कीं, संसाररूप 'इमारतीची,' सांगता पूर्णपणें व्हावयाचीच हें निःसंशय होय. खरोखर संसारसागरातून सुखानें तरून जाण्यास पुरुषांस भार्या ही केवळ साह्यकर्ती मंत्रीच आहे. तिच्यावाचून त्याचें एकही काम पूर्णपणें तडीस जावयाचें नाहीं.

भगिनींनो! तुम्हांस जर आपले नवऱ्यास वश करून घेण्याचा मंत्र पाहिजे असेल, तर मी सांगतें तो नीट लक्षात ठेवा व त्याचा योग्य उपयोग करा, नाहीं तर एका कानानें ऐकून दुसरे कानानें सोडून द्याल; असें मात्र करूं नका. "**पतिव्रता धर्म पाळावा**" हाच तो नवाक्षरी मंत्र बरें! कितीतरी सोपा आहे. हा मात्र अगदीं विसरतां

 183

कामानये व असें झटल्याबरोबर लागलीच हातांत माळ घेऊन त्याचा जप करीत बसावयाचें असेंही नाहीं; तर पूर्णपणें त्याचा आपले अंतःकरणावर ठसा उमटवून व त्याप्रमाणें वर्तन ठेवून लहान नणंदा, जावा, मैत्रिणी, शेजारीपाजारी यांनां कित्ता घालून द्यावयाचा ! तुह्मीं अगदीं क्षुल्लक गोष्टींकरितां नवऱ्यावर कधींही रागावूं नका. पहा ! श्री रामचंद्राचा व सीतेचा अरण्यांत एकाएकीं वियोग झाला असतांही त्यांनीं एकमेकांवर कधीं तरी राग किंवा रुसवा केला होता काय ? तसेंच पुण्यश्लोक अशा नळराजानें स्वप्रिया दमयंती इचा वैराग्यामुळें विश्वासघात करून तिला महाभयानक वनामध्यें निराधार व निरुपाय अशा स्थितींत एकेप्रकारें कपटानें फसवून टाकिलें, तरी सती दमयंती यत्किंचित् तरी नळावर रागाली होती काय ? केवढा हा मनोनिग्रह ! खरोखर, त्या साध्वी धन्य होत !

कोणत्याही मोठ्या लाभाचे अथवा इंद्रियजन्य सुखाचे आशेनें पतिसेवा करावयाची नसते. तुह्मीं असें समजूं नये कीं, जोंपर्यंत नवरा आपलें पालनपोषण करीत आहे, जोंपर्यंत तो तारुण्याचे भरांत आहे, जोंपर्यंत त्याचे आंगीं शक्ति आहे, तोंपर्यंतच त्याची सेवाचाकरी व आदरसत्कार करावयाचा; आणि एकदां कां तो दरिद्री, कंगाल, म्हातारा, बलहीन, रोगी आणि निस्तेज झाला कीं त्याचा तिरस्कार व हेळसांड करावयाची, असें जर कराल तर " बाईल पैशाची पैशाची ! " या सत्पुरुषाचे उक्तीप्रमाणें वर्तन केल्याचा दोष तुमचे माथीं बसेल. तर असें करूं नका. नवरा कोणत्याही स्थितींत कां असेना, त्याची एकनिष्ठ-

पणानें सेवा करावयाचीच व त्याजवर पूर्ण प्रेम ठेवावयाचेंच; कारण तोच तुह्मांला मोक्षदाता आहे.

इतर बायका ज्या वेळेस तुह्मांस भेटण्यास येतील तेव्हां त्यांस तुह्मीं नवऱ्याच्या हितप्रद व प्रिय अशा कामांत गुंतलेल्या आहांत, आणि पतीचे हिताच्या गोष्टी किंवा त्याला आवडणारें काम तुह्मीं फार लक्ष लावून करीत आहांत असें त्यांनां दिसेल असें करावें, ह्मणजे त्याही पण तुमचा कित्ता उचलतील. त्रासून केलेलें काम चांगलें असलें तरी मनाला गोड लागत नाहीं. दुसरें तुह्मांला असें समजलें पाहिजे कीं, नवऱ्याची प्रीति संपादण्याकरितां त्याच्या अहिताचें काम कधींही करूं नये; कारण अहित-कर अशा प्रिय कामानें कोरडी प्रशंसा मात्र होते व तिला दांभिक पतिसेवा असें ह्मणतात.

पुष्कळ स्त्रिया तर अशा असतात कीं, त्या पतिसेवा करितात खरी, पण ती कपाळास सतरा आंठ्या घालून चडफडत व आपल्याशीं दांत ओंठ खात करितात; आणि कित्येक तर अशा आहेत कीं, त्या पतीचें हित करितात खरें, पण त्याबद्दल टोमणे मारमारून त्याला नेहमीं दुःखी करीत असतात. आणि बहुतेक अशा आहेत कीं, खरें असो अगर खोटें असो, नवऱ्याचा नफा होवो किंवा तोटा होवो, त्याला खूष केलें ह्मणजे झालें; किंवा त्याची प्रीति संपादन केली ह्मणजे आपण आपलें खरें कर्तव्य बजा-विलें, एवढेंच त्या समजतात. इतकेंच करून न रहातां व पतीच्या वाईट कामांतही आपली नाखुषी न दाखवितां केवळ त्याची इतराजी न व्हावी ह्मणूनच त्यास

वाईट कामांत सहाय्य देखील करितात; अशी स्त्री पतिव्रता नव्हे तर पातिवरता ह्मणजे पतीची वरात काढणारी आहे व अशा स्त्रीस अप्पलपोटी ह्मणणें हेंच चांगलें. सत्यप्रिय व पतिव्रता स्त्रीला खोट्याचा आणि कपटाचा तिरस्कार असतो, कपट कसें असतें हें तिला स्वप्नांतही माहीत नसतें, आणि तिला सत्य तेंच आवडून, खोटेपणा हें सर्व पापाचें मूळ आहे हें ती आपले मनांत पूर्णपणें बिंबवून ठेवून, ती नेहमीं आपली सद्बुद्धीही जागृत ठेवीत असते. धार्मीक व पतिसेवापरायण स्त्रियांनां खोटा व्यवहार कधींही आवडत नाहीं; त्यांनां माहित असतें कीं, धर्म हा सर्वतोपरी सत्यतेवर अवलंबून असतो. असत्यानें तो केव्हांच नष्ट होऊन जातो; वाळूचें घर जसें टिकाव न धरितां लागलेंच कोसळून पडतें, तसा खोटेपणा व कपटी व्यवहार हा फार वेळ गुप्त न राहतां लवकरच बाहेर पडतो; इतकें असूनही त्यापासून फायदा नसून ज्याज्याशीं तसला व्यवहार असतो त्याची व सर्वशक्तिमान् परमेश्वराची इतराजी मात्र होते; अर्थात् त्यामुळें आपलें सगळीकडून अकल्याण होतें. साध्वी स्त्रीची जशी नवऱ्यावर प्रीति असते तशी ईश्वरावरही तिची भक्ति असते. ईश्वर आपला मायबाप आहे व त्याच्यावर श्रद्धा ठेविल्यानें नवऱ्याचे प्रीतिमध्यें कमीपणा येत नाहीं हें तिला माहीत असतें. ईश्वरावरील भक्तीचें प्रेम दृढ व अचळ आहे व त्याला धर्म हें एक पवित्र बंधन आहे. धर्माशिवाय प्रेम दृढ होत नाहीं; ह्मणून ज्या पुरुषाची बायको स्त्रीधर्मपरायण आहे तो पुरुष व ती स्त्री हीं उभयतां धन्य होत.

---

# भाग ४ था.

भगिनीनों ! शांतिपर्वांत मीं एके ठिकाणीं वाचलें आहे कीं—

**नास्ति भार्यासमोन्बंधुर्नास्तिभार्यासमा गतिः ।**
**नास्ति भार्यासमोलोके सत्वार्थो धर्मसंग्रहे ॥ १ ॥**

" भार्येसारखा अन्य बंधू ह्मणजे मित्र नाहीं, भार्येसमान दुसरी गती ह्मणजे शेवट नाहीं व या कलियुगांत ह्मणजे मृत्युलोकीं धर्माचें साधन करण्यास बायको सारखी दुसरी सहाय्यकर्ता कोणी नाहीं. "

बायको नवऱ्यास व नवरा बायकोस जशीं या संसारांत मित्राप्रमाणें परस्परांस उपयोगीं पडतात, तसा दुसरा कोणींही उपयोगीं पडत नाहीं. अबलांनों ! तुह्मीं नेहमीं एकमेकांचे जवळ राहूं शकतां, हरएक प्रसंगीं प्रत्येक गोष्टींत भागीदार असतां व एकमेकांच्या आवडी आणि मनकामना पूर्ण करूं शकतां; ह्मणूनच 'स्त्री ही पुरुषाची अर्धांगी' असें शास्त्रानें ह्मटलेलें आहे. जो पुरुष आपले अर्धांगी-शिवाय दुसरे स्त्रीबरोबर मित्रत्व जोडूं पहातो त्याची व जी स्त्री आपले प्राणवल्लभाखेरीज परपुरुषाबरोबर सख्यत्व जोडूं पहाते तिची, अशी उभयतांचीही प्रत्येक गोष्टीसंबंधानें निराशा होते. नवरा आणि बायको यांमधील प्रेमाशीं बरोबरी करणारें दुसरें प्रेम सांपडावयाचें नाहीं. हें प्रेम निरंतर व सर्व प्रसंगीं उपयोगीं पडणारें आहे. आणि तें एक सद्धर्मी पत्नीखेरीज कोणाजवळही सांपडणार नाहीं.

भार्येच्या निष्कपट प्रेमापेक्षां या जगांत दुसरी आवडण्याजोगी वस्तु कोणतीही नाहीं; तसेंच बायकोला नवरा हा जसा परमगती आहे, त्याप्रमाणेंच नवऱ्याला बायको ही परमगती आहे. बायको ही केवळ संसारसुखामध्येंच सहाय्य करणारी आहे असें नाहीं; तर संसाररूपी धर्मयुद्धामध्यें ही किल्ल्यासारखी आहे; ह्मणून तिचा आश्रय जरूर करावा. कारण त्यामुळें कामादि रिपुमंडळाची बाधा होण्याची भीति समूळ नाहींशी होते. याप्रमाणें तुह्मी एकमेक परस्परास धर्मसाधनाचे उपाय आहांत. याप्रमाणें दृढ निश्चयानें जर तुह्मी नवऱ्याचा आश्रय कराल आणि तोही जर तुमचा आश्रय करील तर महाप्रचंड शत्रूंकडून देखील तुह्मां उभयतांनां वाईटमार्गाकडे नेववणार नाहीं; मग यःकश्चित जे कपटी व दांभिक पुरुष व यःकश्चित कुटिल विधवा कुंटिणी अनुक्रमें तुह्मांस व तुमचे नवऱ्यास आपल्या मोहक भाषणाचे डौलानें फसवूं पहातात त्यांची कथा काय? एकंदरींत तीर्थ, यात्रा, व्रतोपवास, ईश्वरसेवा वगैरे सर्व कांहीं पतिसेवेंतच घडतें. ज्या बायका नवऱ्याजवळ यात्रेकरितां व व्रतोपवास करण्याकरितां हट्ट घेतात त्या किती अज्ञानी आहेत बरें? अहो, तुह्मांला मोक्षसाधन करण्याकरितां काशी, प्रयागासारख्या लांब ठिकाणीं जाण्याचें व पैशाचा व्यय करण्याचें कांहींच काम नाहीं; कारण तुमचे श्रम वांचविण्याकरितां परमेश्वरानें हा प्रत्यक्ष स्वस्वरूपी पुरुषपिंड तुमचे ताब्यांत दिलेला आहे; इतकें असूनही मग जवळचा लाभ सोडून दूरचे लाभाकरितां उलटा द्राविडी प्राणायाम कां करितां?

तें-( गंगानदिनें सागर सोडुनी कूपा मिळण्या जावें ) या कव्युक्तिप्रमाणें होत नाहीं का ? ह्मणून तुह्मीं जर आनंदानें पतिसेवादक्ष रहाल तर तोच तुह्मांला सर्व कांहीं मिळवून व साध्य करून देईल; तेणेंकरून तुह्मीं धर्मभगिनीपणाचे कळसास पोंचाल व तेव्हांच प्रियदर्शिनिही व्हाल. तुमची कोमल, मधुर व शांत अशी धर्मपरायणता पाहून सर्वांच्या मनांत तुमचेविषयीं पूज्यभाव उत्पन्न होईल व लोक तुह्माला साक्षात् देवी असें समजून मोठा मान देतील.

तुह्मीं पतिसेवेच्या योगानें त्याचे आदरास व मानास पात्र होऊन सदयांतःकरणानें दुःखी, दरिद्री, अंध, पंगू अशांवर दया करीत जा व मीं पतिव्रता आहें असा गर्व वाहून फुगूं नका. पहा ! तुमचे शिवाय नवऱ्यास सुख देणारा कोणीही नाहीं. एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं,—

मातासमं नास्ति शरीर पोषणम् ।
भार्यासमं नास्ति शरीर तोषणम् ।
विद्यासमं नास्ति शरीर भूषणम् ।
चिंतासमं नास्ति शरीर शोषणम् ॥

अज्ञानावस्थेंत आईसारखें शरीराचें पोषण करणारा कोणी नाहीं, स्त्रीखेरीज शरीरास सुख देणारा कोणी नाहीं, विद्येसारखा शरीरास भूषविणारा दुसरा पदार्थ नाहीं, आणि चिंतारूपी चितेसारखा शरीरास जाळणारा दुसरा पदार्थ नाहीं. तर बायांनों ! त्याला कांडी इतकेंही न दुखविता परस्परांच्या मदतीनें संसाररूपी समुद्रांतील अनेक

संकटांचें निवारण करून परतीरास जाऊन पोहोंचा ह्मणजे मिळविलीत. तुह्मीं दागिन्याच्या, पैशाच्या अगर इतर कोणत्याही पदार्थांच्या लालचीनें फसून व इंद्रियजन्य सुखोत्पादक दुष्ट लोकांचे नादीं लागून आपल्या पतिव्रता धर्मास व बेचाळीस कुळांस कलंक लावाल तर त्याविषयीं सावध असा; तशाच कांहीं कुंटिणी स्वतः पैसे मिळविण्या-करितां तरुण, अज्ञान व सुरूप स्त्रियांस नानातऱ्हेच्या दुष्ट लालुची दाखवून व तोंडापुरतें गोड गोड भाषण करून त्यांस पातिव्रत्यधर्मापासून भ्रष्ट करण्याविषयींचा प्रयत्न करतात. तर अशा कुंटिणींबद्दल चांगली सावधगिरी ठेऊन होईल तितकें करून त्यांच्या वाऱ्यालाही उभें रहाण्याचा प्रसंग न येईल असें करीत असा.

तुह्मीं आपल्या प्रिय पतीखेरीज, ज्यांच्या उदरीं जन्म घेतला व जे तुह्मांला ज्ञानाचे धडे शिकवितात त्यां-शिवाय एका कुतऱ्याचा देखील विश्वास धरूं नका. कारण त्यापासून कोणत्या वेळेस फसाल हें सांगवत नाहीं. तसेंच भगिनींनों! कांहीं बायकांनां घरांतील पदार्थ चोरून खाण्याची संवय असते, तिचा दोष तुमचे सासूकडे आहे. सासूनें सुनेस खावयाला दिलें नाहीं ह्मणजे ती चोरून खाई-लच. बायांनों! तुह्मींही पुढें सास्वा होणार आहात, तेव्हां सुनांस कसें वागवावयाचें हें आतांपासून नीट ध्यानांत ठेवा, आणि या काळांत आपली मर्यादा आपले हातानें जितकी राखवेल तितकी राखण्याविषयीं सतत झटत असा. कांहीं ठिकाणीं असा प्रकार पहाण्यांत येतो कीं, सून व

मुलगी ह्या दोघींत नव्वद सास्वा अशा दिसून येतात कीं, सुनांपेक्षां मुलींवर अधिक ममता करितात. घरांत कांहीं गोड पदार्थ केला ह्मणजे आधीं व जास्त मुलीला आणि थोडा व मागून सुनेला. याचप्रमाणें हरएक गोष्टींत दिसून येतें. हर! हर! नमस्कार असो अशा सास्वांनां! त्यांनां एवढें समजत नाहीं कीं, जिच्या-योगानें आपल्या मुलाचे दोन हातांचे चार हात झाले व तो आहे ह्मणूनच आज ती परक्याची मुलगी जिची यापूर्वी तोंडओळख किंवा अर्थाअर्थीं संबंधही नसून केवळ आपले मुलासाठीं आपले हाताखालीं आली. तिला आपल्या मुली-प्रमाणेंच वागविणें अवश्य आहे. अशा द्वाष्ट सास्वांची दुष्ट करणी जोंपर्यंत सून समजूतदार झाली नाहीं तोंपर्यंतच बिनबोभाट चालत असते. एकदां कां घरसंसार तिचे आटोक्यात आला ह्मणजे त्या दुष्ट करणीचा लगेच अस्त होतो; इतकेंच नाहीं तर त्याबरोबर त्या कजाग सास्वेस घरातील एखाद्या कोपऱ्यांत चुरमुरे खात स्वस्थ हरीहरी ह्मणत पडावें लागतें. मग त्या सुनेच्या सूड उगविणाऱ्या तऱ्हा व उठतां बसतां सासूला देण्यांत येणारे टोमणे हें पहाणेंच नको. ही कोणास अतिशयोक्ती वाटेल परंतु तसें कोणी समजूं नये, वर्तमानकाळांतील वरील रीतीभातीचा विचार केला असतां हें सहज समजून येईल.

बायानों! अशा सासुरवासापासून कोणकोणते वाईट परिणाम घडतात हें (हल्लींच्या काळीं आपल्या या हिंदुस्थानांत) आपण कानांनीं ऐकत व प्रत्यक्ष पहात आहोंत. बहुतेकवेळीं

या सासुरवासापासून सुनांच्या जिवास अपाय घडलेलीं बरींच उदाहरणें तुमच्या पहाण्यांत व ऐकण्यात आलींच असतील; तर ही गोष्ट तुम्हीं पक्की ध्यानांत ठेवा. कलियुगाचें वारें फार चमत्कारिक आहे. असो. संसारांतील प्रत्येक गोष्ट उभयतां स्त्रीपुरुषांनीं परस्पराचे सहाय्यानें करून, आपले अज्ञान मुलांबाळांस, दुर्व्यसनांत सांपडलेल्या इष्टमित्रांस व देशबांधवांस कित्ता घालून त्यांस सुमार्गीं लावण्यास झटावें व सुधारकांना देश सुधारणेचे कामांत पूर्णपणें मदत करावी, हें प्रत्येक स्वदेशाभिमानी पुरुषानीं आपलें कर्तव्यकर्म आहे असें समजून तें करण्याविषयीं सतत दक्ष असावें.

स्वदेशबांधवहो ! तुम्हालाही एवढेंच सांगतें कीं, जरी स्त्रिया तुमचे आज्ञेंत वागतात तरी त्यांना बटकीप्रमाणें राबवून दुःख देण्यास किंवा त्यांचे स्वतंत्रतेंत हात घालून त्यांत ढवळाढवळ करण्यास कधींही उद्युक्त होऊं नका. जर ती तुमची अर्धांगी आहे असें समजत असाल तर त्यांच्या हक्काच्या गोष्टींत त्यांचा योग्य मान राखा. प्रत्येक गोष्टींत तिला साह्य करून व समजत नसतील त्या गोष्टी समजावून देऊन संसारगृहधंद्यांत, संततीचे जोपासनेंत, संपत्ति संरक्षण करण्याचे कामांत, त्यांना प्रवीण करून, जेणेंकरून त्यांचीं कोमल मनें तुमच्या तारुण्यांतील अवसानमदानें दुर्व्यसनाकडे बहकणार नाहींत असें करा. केवळ त्यांना तुमची भीतिच वाटेल असें न करितां त्यांच्याशीं खेळगड्याप्रमाणें राहून जेणेंकरून तुम्हीं त्यांच्या अंतःकरणास

प्रेमपात्र भासाल व त्या तुह्मांला पूज्य मानतील असेंच त्यांच्याशीं नेहमीं वर्तन ठेऊन परस्पर प्रीति वृद्धिंगत होऊन दृढ होईल असें करा. एकंदरींत तुह्मीं आपले विद्याबलानें, बुद्धिबलानें व यथाशक्ति संपत्तिबलानें संसारांतील हरएक कामें तिचे तुमचे सहाय्यानें करून ह्या बिकट संसाररूपी इमारतीस पूर्णपणें बळकटी आणा व आपले मागून आपलें नांव चालविणाऱ्या अजाण कुलरक्षक संततीस कित्ता घालून ठेवा; ह्मणजे तुह्मीं आपलें कर्तव्यकर्म पूर्णपणें बजाविलें असें होईल. पहा पत्नीची योग्यता फार मोठी आहे, हें ह्मणजे तुह्मांस नव्यानें सांगितलें पाहिजे असें मुळींच नाहीं. सर्वांत तप्त झालेल्या अंत:करणास संतोष देणारी, दु:खित झालेल्या व पीडलेल्या मनास त्या दु:खाचें हरण करून रंजविणारी व थकलेल्या देहास पूर्णपणें सुखविणारी पत्नीशिवाय या जगांत तुह्मांस कोणी सांपडणार नाहीं.

आईबापांनीं जन्म दिला आहे ह्मणून त्यांना श्रेष्ठ मानिलें पाहिजे. प्राणांताचे वेळेसही जो खरा मित्र आहे तो आपले संकटास हातभार लावून स्वत: मरण्यास देखील तयार असतो, ह्मणून त्यालाही श्रेष्ठ मानलें पाहिजे व स्वभार्येबरोबर तर सर्व आयुष्य सुखानें घालवितां, तर तिलाही श्रेष्ठ मानलेंच पाहिजे. या चौघांशिवाय किंबहुना प्रत्यक्ष बंधू देखील उपयोगी पडणार नाहीं आतां श्वशुरादिक, चुलते, मामा, यांची गोष्ट मातापिता यांच्या श्रेष्ठपणांत सामावली गेली आहे; बाकी बंधु, सापत्न बंधु व इतर आप्तमंडळ यांचेमध्यें आतांचे काळीं तरी कांहीं अर्थ दिसून येत नाहीं, हें कोणीही प्राजळपणें कबूल करील

आतां सगळें रामायण ऐकल्यावर रामाची सीता कोण असें विचारणारेही कांहीं दिव्य पुतळे अशी शंका घेतील कीं, वरील सर्व गोष्टी आह्मांस कबूल आहेत; पण बायकोला काय ह्मणून श्रेष्ठ मानावी? तर त्या पुरुषांची शंका निवारण करण्यास हेंच उत्तर कीं, स्त्रियांनां अगदीं नीच मानणें हा त्यांचा महादोष आहे. एवढ्यानेंच आज कित्येक स्वदेशाभिमान्यानां स्त्रीशिक्षणाचे कामांत अतोनात परिश्रम करावे लागत असून परकीयांची हांजी हाजी करावी लागत आहे व त्यांचे तोंडाकडे पहावें लागत आहे. ही स्थिति केवळ स्त्रियांनां बटकी समजून त्यांजकडून कष्टांचीं कामें करवून घेणें, त्यांच्या सुखाविषयीं दुर्लक्ष्य करणें, त्यांची हरघडी कमी योग्यतेच्या मनुष्याचे देखत अमर्यादा करणें, यापासून प्राप्त झाली आहे. मोठमोठ्या धर्मसिंधुआदि पुराणांकडेस व मनुस्मृतिआदि ग्रंथांकडेस जर तुह्मीं आपली नजर फिरवाल तर स्त्रियांनां कोणत्या रीतीनें वागवावें व कोणत्या रीतीनें त्यांचा मान ठेवावा, हें तुह्मांस समजून येईल. तुमची घरांतील स्त्री जर आनंदीत असेल तरच लक्ष्मी तुमचे घरीं वास करील. जेणेंकरून तुमच्या स्त्रिया नेहमीं आनंदी राहतील व तुमच्याविषयीं त्यांचे मनांतील पूज्यभाव सतत जागृत राहील असेंच तुह्मीं आपलें वर्तन त्यांच्याशीं ठेविलें पाहिजे.

भगिनींनों! आतां काय काय करावयाचें व कोणकोणत्या गोष्टी ध्यानांत ठेवावयाच्या हें समजलें ना? दुर्व्यसन, लोभीपणा हीं अगदीं कामाचीं नाहींत. हें विष एखादे

दिवशीं तरी तुह्मांस मारकच होईल, हें ध्यानांत ठेवा. खालीं लिहिलेलीं भूषणें जर तुह्मी सतत आपले आंगावर वागवाल तर देशसुधारकांकडून, प्रियजनांकडून व प्रत्यक्ष प्रियपतीकडून धन्य धन्य असें ह्मणवून घ्याल. तीं भूषणें कोणतीं तर—

हस्तस्य भूषणं दानं । सत्यं कंठस्य भूषणं ॥
श्रोत्रस्य भूषणं शास्त्रं । भूषणैः किं प्रयोजनं ॥१॥

हीं भूषणें कितीतरी चांगलीं आहेत बरें? असो! आतां इतका वेळ वर सांगितलेली भाकडकथा आहे असें समजून तिचा तिरस्कार करूं नका. तर हे स्वदेशभगिनींनो! स्वदेश-हितेच्छु बांधवांनो! माझ्या वेड्यावांकड्या लिहिलेल्या निबंधाचा योग्य विचार करून फुरसत मिळाल्यास आपल्या इष्टमित्रांस व मैत्रिणींस हें पुस्तक वाचण्यास लावून व सर्वत्रांचें सहाय्य मिळवून अनंतकालपर्यंत राहणारी, ही संसाररूपी इमारत उदयास आणण्याचा प्रयत्न करा. हेंच या स्वदेशभगिनीचें तुमचेजवळ पदर पसरून सततचें मागणें आहे. तसेंच वरील उपदेशाचे दोन शब्द तुह्मी आपले अंतःकरणांत बाळगून स्वतःस, तुमचे मुलांबाळांस, मित्रांस व मैत्रिणींस त्यापासून होईल तेवढा उपयोगच करून द्याल व पुस्तककर्तीस उत्तरोत्तर अशाच तुह्मां स्वदेशभगिनींची व बांधवांची सेवा करण्यास उत्तेजन द्याल अशी आशा करितें व त्या जगन्नियंत्या परमेश्वराची सदरहू अल्प सेवा निर्विघ्नपणें तडीस नेल्याबद्दल अंतःकरणपूर्वक प्रार्थना करून तुमचा निरोप घेतें

# श्रीमन्महाभारतांतील सुबोध वेंचे.

( संग्राहक, पंडित कुमठा नारायणाचार्य. )

पुत्रार्थं भर्तृपोषार्थं स्त्रियः सृष्टाः स्वयंभुवा ।
अपतिर्वापि या कन्या अनपत्या च या भवेत् ।
तासां जन्म वृथा लोके गतिस्तासां न विद्यते ७६।३८

सृष्टिकर्त्यानें संततिसाठीं आणि पतिशुश्रूषेसाठीं ह्मणूनच स्त्रिया निर्माण केल्या आहेत. यासाठीं या लोकांत जी स्त्री पतिहीन किंवा संततिहीन होईल तिचा जन्म व्यर्थ होय. आणि तशा स्त्रियांना सद्गति मुळींच नाहीं. ७६।३८

नहीदृशं संवननं त्रिषु लोकेषु विद्यते ।
दया मैत्री च भूतेषु दानं च मधुरा च वाक् ८१।२०

सर्व प्राण्यांवर दया करणें, मित्रत्व, दान आणि चौथें मधुर वचन यांसारखें वशीकरण तीनही लोकांचेठायीं नाहीं. ८१।२०

शरीरकृत्प्राणदाता यस्य चान्नानि भुञ्जते ।
क्रमेणैते त्रयोऽप्युक्ताः पितरो धर्मशासने ९३।२५

जन्म देणारा, अभयदाता आणि ज्याचें आपण अन्न खातों तो, हे तिघे पितर होत, असें धर्मशास्त्रांत सांगितलें आहे. ९३।२५

पिता रक्षति कौमारे भर्ता रक्षति यौवने ।
पुत्रस्तु स्थाविरे भावे न स्त्री स्वातन्त्र्यमर्हति ९४।७

स्त्रीचें रक्षण कौमार्यावस्थेंत पिता करितो आणि ह्मातार-

पणांत पुत्र करितो. एकूण स्त्रिया केव्हांही स्वातंत्र्यास पात्र नाहींत. ९४।७

**मन्यते पापकं कृत्वा न कश्चिद्वेत्ति मामिति ।**
**विदन्ति चैनं देवाश्च यश्चैवान्तरपूरुषः ९८।१०**

पापकर्म करून ' मला कोणीही पाहिलें नाहीं, ' असें पापी मनुष्य समजत असतो; परंतु ती त्याची समजूत चुकीची आहे. कारण देव सर्वही पाहतो आणि याचा अंतरात्मा भगवान् तोही याचें पापकर्म जाणत असतो. ९८।१०

**सा भार्या या गृहे दक्षा सा भार्या या प्रजावती ।**
**सा भार्या या पतिप्राणा सा भार्या या पतिव्रता ९८।२२**

जी गृहकर्मांत कुशल असते ती भार्या होय; जी संततिमान् असते तीच भार्या होय; जी आपल्या प्राणप्रिय पतीवर प्राण ठेवून असते तीच भार्या होय; आणि जी पतीचें आचरण आपणही आचरिते तीच भार्या होय. ९८।२२

**अर्धं भार्या मनुष्यस्य भार्या श्रेष्ठतमः सखा ।**
**भार्या मूलं त्रिवर्गस्य यः सभार्यः स बन्धुमान् ९८।२३**

गृहस्थाश्रमांत भार्या ही पुरुषाचें अर्धांग आहे ( ह्मणजे भार्येवाचून पुरुषाला पुरुषार्थप्राप्तीचा मार्ग साधत नाहीं. ) तसेंच भार्या ही पुरुषाचा श्रेष्ठ मित्र आहे. धर्म, अर्थ, आणि काम हे पुरुषार्थ साध्य होण्यास मूळ कारण भार्याच आहे याकरितां ज्याला भार्या आहे तोच बंधुमान् असें समजावें. ९८।२३

**भार्यावन्तः क्रियावन्तः सभार्या गृहमेधिनः ।**
**भार्यावन्तः प्रमोदन्ते भार्यावन्तः श्रिया वृताः ९८।२४**

जे भार्यावंत तेच क्रियावंत; जे भार्यावंत तेच गृहस्थ; जे भार्यावंत तेच सुखी; आणि जे भार्यावंत तेच संपत्तिवान्. ९८।२४

**अन्यान्यरिवदन्साधुर्यथा हि परितप्यते ।**
**तथा परिवदन्नन्यान्हृष्टो भवति दुर्जनः ॥ ९९।१९**

परक्यांची निंदा करीत असतां साधु मनुष्य जितका संताप पावतो, तितकाच परक्यांची निंदा करीत असतां नीच मनुष्य संतोष पावतो. ९९।१९

**सर्ववेदाधिगमनं सर्वतीर्थावगाहनं ।**
**सत्यचैव च राजेन्द्र कलां नार्हति षोडशीम् ९९।३२**

शकुंतला दुष्यंतास ह्मणाली हे राजश्रेष्ठा ! सर्व वेदांचें अध्ययन असो किंवा सर्व तीर्थांचें स्नान असो; त्यांची योग्यता एका सत्य वचनाच्या सोळाव्या हिश्याबरोबरही होणार नाहीं. ९९।३२

**नास्ति सत्यसमो धर्मो न सत्याद्विद्यते परम् ।**
**नहि तीव्रतरं पापमनृतादिह विद्यते ॥ ९९।३३**

सत्यासमान धर्म नाहीं, आणि सत्यापेक्षा श्रेष्ठही दुसरें कांहींच नाहीं; तसेंच या जगांत असत्याहून अति तीव्र पातकही दुसरें कांहींच नाहीं. ९९।३३

**यः स्वदारान्परित्यज्य पारक्यां सेवते स्त्रियम् ।**
**निरयान्नैव मुच्येत यावदाभूतसंप्लवम् ॥ १०३।५**

जो पुरुष आपल्या स्त्रीचा त्याग करून परस्त्रियेस भजतो, तो ब्रह्मप्रलयापर्यंत नरकांतून मुक्त होणार नाहीं. १०३।५

४९३.



**अन्यभावगतां चापि को नारीं वासयेद्गृहे १०९।७४**

परपुरुषावर मन ठेवणाऱ्या स्त्रियेस आपल्या घरांत कोण बरें राहूं देईल? १०९।७४

**भार्याया भरणाद्भर्ता पालनाच्च पतिः स्मृतः ११३।२०**

नवरा आपल्या बायकोचें अन्नादिकेंकरून भरण ह्मणजे पोषण करितो ह्मणून नवऱ्यास भर्ता व अनेक संकटांपासून तिचें पालन करितो ह्मणून पति असें ह्मणतात. ११३।२०

**अभिगम्य परं नारी पतिष्यति न संशयः।**

स्त्री ही नवऱ्याशिवाय दुसऱ्या पुरुषास भजेल तर ती निःसंशय पतित होईल.

**मृते भर्तरि साध्वी स्त्री ब्रह्मचर्यव्रते स्थिता।**
**यमैश्च नियमैः पूता मनोवाक्कायजैः शुभा १३४।८४**
**भर्तारं चिन्तयन्ती सा भर्तारं निस्तरेच्छुभा।**
**तारितश्चापि भर्ता स्यादात्मा पुत्रस्तथैव च १३४।८५**

आपला पति मृत झाला असतां, नंतर पतिव्रता स्त्री ही जर ब्रह्मचर्यव्रत पाळील, आणि कायावाचामनाच्या यमनियमांनीं पवित्र होईल व आपल्या मृत पतीचेंच सतत चिंतन करीत आयुष्याचे दिवस घालवील, तर ती विधवा स्त्री शुभ स्त्री असून आपल्या पतीसही तारण करील; अर्थात् या प्रकारच्या जीवंत असलेल्या मंगल विधवा स्त्रियेकडून आपला पतीही तारिल्यासारखा होईल, तसेंच आपणही आणि आपला पुत्रही तारिल्यासारखें होईल. सहगमनविधीपेक्षां हा विधि उत्तम आहे, असा अर्थ.

———

# महिला-क्लेश-निवारण

किंवा

## विवाहित स्त्रियांस आरोग्यासंबंधीं महत्वाचा उपदेश.

या अत्यंत उपयुक्त पुस्तकांत **रजोदर्शन**, तत्संबंधीं विकृति व त्यांजवरील उपचार; **गर्भधारणा**, गर्भपाताचीं कारणें, गर्भपात निवारण व उपचार; प्रसूतिपूर्वींची, त्या वेळची व नंतरची स्थिति, व्यवस्था, अडचणी व त्यांवरील उपाय; **अपत्यपोषण, स्तनांच्या विकृति** व त्यांवरील उपचार; मूल पाजणें व पाजण्याचें बंद करणें, मुलांच्या कृत्रिम तऱ्हेच्या पोषणाच्या व पोषाखाच्या पद्धति, युक्तायुक्तता वगैरे; ह्या व तदनुषंगिक इतर अनेक विषयांवर सर्वांगपूर्ण, शास्त्रीय, सुलभ व आवश्यक माहिती दिलेली आहे. बडोदें सरकारच्या विद्याधिकाऱ्यांकडून उदार आश्रय व सौ० गिरिजाबाई केळकर व इतर अनेक पदवीधर डॉक्टर वगैरेंचे सर्वोत्कृष्ट अभिप्राय. पृष्ठसंख्या १२५ वर किं. ८१०

---

# अबलाज्ञानसुधा.

ह्या पुस्तकाच्या बऱ्याच आवृत्त्या अगदीं थोड्या काळांत खपून गेल्या आहेत. हें पुस्तक एका भगिनीनें अगदीं सरळ, सुलभ व गोड भाषेंत लिहिलें असून त्यामध्यें स्त्रियांस फार महत्वाचा सदुपदेश केलेला आहे. पूर्वीं याची किंमत ८३ होती ती आतां मुद्दाम ८१ केली आहे.

पत्ता—लोकमित्रकर्ते पोष्ट० खानापूर जि० बेळगांव

---